दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/१२१/२०१८
दि.१५/०९/२०१८.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.

श्री.राजू विश्वकर्मा, ................अपिलार्थी
फाईट फॉर राईट, शॉप नं.५,
जयसाई पुजा बिल्डींग, कस्तुरी पार्क,
नवघर रोड, भाईंदर (पूर्व), जि.ठाणे.

जनमाहिती अधिकारी तथा, ................प्रतिवाद
आस्थापना अधिक्षक (आस्थापना)

## -: विवेचन :-

श्री.राजू विश्वकर्मा यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांचेकडे दि.१९/०७/२०१८ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

**विषयः- डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजना अंतर्गत लाभार्थ्यांची माहिती व कारवाईबाबत.**

अ) वरील विषयांकित योजनेबाबत शासन परिपत्रक, जिल्हाधिकारी निर्देश, शासन निर्देश, महानगरपालिका अधिनियम यांची साक्षांकीत माहिती पुरविणे.

ब) मिरा भाईंदर महानगरपालिकेतील ज्या लाभार्थ्यांना वरील विषयांकित योजनेनुसार निवासस्थाने देण्यात आली त्याबाबतचे स्थायी समिती सभा, पालिका महासभा मंजूर ठराव, लाभार्थ्यांची यादी, प्राप्त निवासस्थाने पत्ते याबाबत साक्षांकीत माहिती पुरविणे.

क) वरील विषयांकित योजनेचा लाभ ज्या लाभार्थ्यांना देण्यास आला आहे त्या सर्व लाभार्थ्यांना मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासनातर्फे वेतनासह देण्यात येणाऱ्या घरभाडे भत्ता (एच.आर.ए.) देण्यात येत असल्यास ज्या लाभार्थ्यांना घरभाडे भत्ता देतो, त्यांची नावे, पत्ता, घरभाडे भत्ता याबाबत साक्षांकीत माहिती दस्ताऐवज पुरविणे.

ड) वरील विषयांकित योजनेचा लाभ ज्या सफाई कर्मचाऱ्यांना देण्यात आला त्या लाभार्थी कर्मचाऱ्यांची सदर योजनेसाठी मंजूरी व निवासस्थानाचा लाभ मिळवून देणाऱ्या आयुक्तांसह सर्व संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करुन नावे, पदनाम, सेवा विभाग याबाबत साक्षांकीत माहिती पुरविण्यासह या प्रकरणी शासन, ठाणे जिल्हाधिकारी यांचेकडे करण्यात आलेला सर्व दस्ताऐवजांच्या साक्षांकीत प्रती पुरविणे.

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**

माहिती अधिकार अंतर्गत दि.१९/०७/२०१८ रोजीच्या पत्रान्वये अपुर्ण माहिती दिली असल्याने अपिलार्थी अर्जदार यांनी दि.२८/०८/२०१८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**

अपिलार्थी अर्जदार व जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.१५/०९/२०१८ रोजी दुपारी १२.१० वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.आस्था/३६०/२०१८ दि.३०/०८/२०१८ अन्वये कळविण्यात आले होते.

परंतु सदर दिवशी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना) हे उपायुक्त (सा.प्र.), कोकण विभाग यांचे कार्यालयात बैठकीसाठी गेले असल्याकारणाने सुनावणी रद्द करण्यात आली असुन सदर सुनावणी दि.१८/०९/२०१८ रोजी दुपारी ०३.२० वाजता आयोजित करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने अपिलार्थी अर्जदार व जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांना जा.क्र.मिभामनपा/उपआ.आस्था/३६८/२०१८ दि.१५/०९/२०१८ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

१) **अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद:-** माहिती अधिकार अंतर्गत मला अपुर्ण माहिती दिलेली आहे.

२) **जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-** अपिलार्थी अर्जदार यांना माहिती दिली असुन पुनश्च: सुधारित माहिती देण्यात येईल.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

## -: निर्णय :-

१) मुद्दा क्र.ब,क व ड ची माहिती मिळाल्याचे अपिलार्थी अर्जदाराने सुनावणी दरम्यान मान्य केले असुन मुद्दा क्र.अ बाबत जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक यांनी अपिलार्थी अर्जदारास १० दिवसांत नि:शुल्क माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. वरील निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात आले.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

(विजयकुमार म्हसाळ)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रतिः-

१) श्री.राजू विश्वकर्मा,
फाईट फॉर राईट, शॉप नं.५,
जयसाई पुजा बिल्डींग, कस्तुरी पार्क,
नवघर रोड, भाईंदर (पूर्व), जि.ठाणे.

२) जन माहिती अधिकारी तथा
आस्थापना अधिक्षक (आस्थापना)

३) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना) यांचे कार्यालय.